## **ब वर्ग** तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी पायाभूत सुविधा (Infrastructure) उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-

१. मुख्य रस्त्यापासुन तिर्थक्षत्र / यात्रास्थळ / मुख्यस्थळ / मंदीर / समाधी इत्यादी सारख्या मुख्य स्थळापासून मुख्य रस्त्यापर्यंतच्या (Main Road) ज्यांचे अंतर अंदाजे ८०० ते १००० मीटर असेल अशा पोहोच रस्त्याचे (Approach Road) चे काम हाती घेता येईल. त्या अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण, रुंदीकरण या व इतर माध्यमातून काम करता येईल.

२. पोहोच रस्त्यावर पथदीवे उभारता येतील.

३. मंदिर परिसरात संरक्षण भिंत बांधता येईल.

४. पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधणे व त्या अनुषंगाने परिसरात नळाद्वारे पाणी पुरवठा करणे अशी कामे हाती घेता येतील.

५. तिर्थक्षेत्र नदी किंवा ओढा यांच्याजवळ असेल तर अशा नदी किंवा ओढयावर संरक्षण भिंत बांधण्याचे काम हाती घेता येईल.

६. स्त्री व पुरुष शौचालय आणि स्नानगृहे बांधता येतील.

७. स्त्री व पुरुष भाविकांच्या निवासासाठी वेगवेगळी भक्त निवासे बांधता येतील,

८. तिर्थक्षेत्राचा परिसर सुशोभित व स्वच्छ रहावा या दृष्टीकोनातून उपलब्ध जागेवर झाडे लावणे आवश्यक राहील. तसेच आवश्यक त्या ठिकाणी Paving Block चेही काम करता येईल.

९. भाविकांच्या वाहनासाठी Paving Block सह वाहनतळाचे बांधकाम करता येईल.